महाराष्ट्र टाइम्स

**Maharashtra Times**
9 Feb 2017

# 'सुपरवासी'च्या शिरपेचात मानाचा तुरा

**म. टा. प्रतिनिधी, ठाणे**

देशभरातून आलेल्या सामाजिक संस्थांच्या आयआयटी खरगपूर येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत ठाण्यातील येऊरच्या 'सुपरवासी' (क्रायसेस) या संस्थेने प्रथम क्रमांक पटकावला आहे. येऊरमधील आदिवासी महिलांसह मुलांसाठी काम करणाऱ्या या संस्थेने मिळवलेले यश निश्चितच कौतुकास्पद असून या यशानंतर देशभरातून संस्थेकडे स्वयंसेवक म्हणून काम करण्यासाठी उत्सुक असलेल्या विद्यार्थ्यांची रीघ लागलेली आहे.

आधीच्या क्रायसेस (क्रिएटिव्ह रिस्पॉन्सिबल एटींग्रेटेड) आणि त्यानंतर नुकत्याच 'सुपरवासी' या नावाने नवीन ओळख निर्माण केलेल्या येऊरमधील या संस्थेने ३ ते ५ फेब्रुवारीदरम्यान पश्चिम बंगालच्या आयआयटी खरगपूर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत भाग घेतला. या परिषदेत तळागाळातील समाजाला उद्योजकतेच्या माध्यमातून धडे देत काम करणाऱ्या विविध संस्थांनी सहभाग नोंदवला होता. परिषदेत परीक्षक असलेल्या उद्योग क्षेत्रातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देत त्यांनी दिलेला विषय थोडक्यात मांडण्याच्या स्पर्धेत 'सुपरवासी'चे स्वयंसेवक अव्वल ठरले. या परिषदेत सुपरवासीच्या अपूर्वा आगवण, सेतू पारिख, ग्लेन फर्नांडिस, बार्बरा बिंडर यांनी संस्थेचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय कामगिरी केली. तसेच परिषदेतील या यशामुळे सामाजिक संस्थांमध्ये स्वयंसेवक म्हणून काम करण्यासाठी उत्सुक असलेल्या शेकडो विद्यार्थ्यांचे अर्ज सुपरवासीला आले असून त्यातील निवडक विद्यार्थ्यांना संस्थेसोबत काम करण्याची संधी दिली जाणार असल्याचे अपूर्वा आगवण यांनी 'मटा'शी बोलताना सांगितले.

**आयआयटी खरगपूरच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत भारतात प्रथम**

दरम्यान, लघुउद्योग क्षेत्रातील मोठमोठ्या कंपनीसाठी लहानसहान पार्ट्स बनवणे, तसेच रिसोर्स प्लॅनिंग, डेटा एन्ट्री, डीटीपी आदी कामे सुपरवासी संस्थेच्या माध्यमातून येऊरमधील स्थानिक आदिवासी महिला करतात. त्यातून त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी सुपरवासी संस्थेकडून काम केले जाते. उद्योगविषयक उत्पन्नातूनच संस्थेच्या आर्थिक बाबींना हातभार लावला जातो. त्यामुळे आयआयटी खरगपूरच्या आंतरराष्ट्रीय परिषदेतील यश संस्थेसाठी मोलाचे असल्याचेही आगवण यांनी सांगितले.

---

ENTREPRENEURSHIP CELL
IIT KHARAGPUR

## Certificate

**Global Entrepreneurship Summit '17**
03rd-05th Feb 2017
www.ges.ecell-iitkgp.org

*This is to certify that Mr/Ms* Setu Parikh *of* SUPERVASI *secured '1st' placed in 'Elevator Pitch' competition and participated in the Global Entrepreneurship Summit 2017, organized by Entrepreneurship Cell, Indian Institute of Technology Kharagpur.*

**Prof. P.K. Dan**
Chairman, Monitoring Committee,
Entrepreneurship Cell, IIT Kharagpur